**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १२९४/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री.राजेश गणेश भगत**
१२/९, आर्टिस्ट व्हिलेज, सेक्टर ८,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका,भुखंड क्र.१ व २, किल्ले गावठाणजवळ, पामबीच, जंक्शन, सेक्टर-१५ ए, सीबीडी बेलापूर,नवी मुंबई ४०० ६१४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका,भुखंड क्र.१ व २, किल्ले गावठाणजवळ, पामबीच, जंक्शन, सेक्टर-१५ ए, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १४.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २०.०८.२०२१ | -- | १७.०१.२०२२ | १५.०२.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि. ३१.०५.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १४.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ मधील ( व्याख्या) मधील माहिती संज्ञेच्या स्वयं स्पष्टतेनुसार नवी मुंबई महानगरपालिका अखत्यारीतील अभियंता विभाग या कार्यालयाच्या रचनेप्रमाणे प्रशासकीय कामकाजात अंतर्भुत असणाऱ्या व निर्णय प्रक्रीयेत अनुसरण्यात येणाऱ्या नियम, विनियम आणि शासन आदेश, धोरण यांच्या आधारे निविदा द्वारे न.मु.म.पा क्षेत्रात विकासाची कामे या कामकाजाशी संबंधित, उपलब्ध असणाऱ्या याविषयीच्या दप्तराची पहाणी करणेसह आवश्यक दसताऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह तपशिलवार माहिती मिळणे.*

*१) अ) जा.क्र.नमुमपा/का.अ. (बेलापूर) /१७६/२०१८ दिनांक ०१/१२/२०१८ च्या पत्रानुसार मे प्रतिक कंन्स्ट्रक्शन ई.२०१ सुर्योदय आनंद को.ऑ.हौ.सोसायटी यांनी बेलापूर विभ्ज्ञागतील सेक्टर-८ बी येथील वासुदेव बळवंत फडके शाळेजवळ पायऱ्या बांधणे या कलेल्या कामाची अंतीम बीलाची छायांकित व प्रमाणित साक्षांकित माहिती मिळणेबाबत.*

*ब) में प्रतिम कंन्स्ट्रक्शन यांनी बेलापूर विभागतील सेक्टर-८बी येथील वासुदेव बळवंत फडके शाळेजवळ पायऱ्या बांधण्याचे कलेल्या कामाच्या मेजरमेंट बुकची तसेच approval drawing चह साक्षांकित व प्रमाणित माहितीचे पाहणी करणेसह आवश्यक माहिती मिळणे.*

*२) क) मे.प्रतिक कंन्स्ट्रक्शन यांनी वासुदेव बळवंत फडके शाळेजवळील पायऱ्या बांधण्यात SCHEDULE-B च्या अनुक्र.२ च्या नुसार Soling in १५ cm to २० cm दिलेल्या कामानुसार काम केले आहे का?*

*ड) SCHEDULE-B च्या अनुक्र.३ च्या नुसार P.C.C. केलेली आहे का? असे काम केले असल्यास त्याची साक्षांकित व प्रमाणित माहिती मिळणेबाबत.*

*ई) SCHEDULE-B च्या अनुक्र.४ च्या नुसार किती टक्के Plum तसेच किती टक्के M २० cement concrete वापरले आहे. असल्यास त्याची माहिती मिळणे.*

*३) वरील तिन्ही अनुक्र.२, ३, ४ चे काम ज्या अधिकारी यांनी पाहणी केली त्या अधिकारी यांचे नावाची माहिती मिळणेबाबत."*

या तक्रार अर्जासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झालेली नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. प्रस्तुत प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २०.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२७.११.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई :४०० ६१४.
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१ व २, किल्ले गावठाणजवळ, पामबीच, जंक्शन, सेक्टर-१५ ए, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१ व २,
किल्ले गावठाणजवळ, पामबीच, जंक्शन, सेक्टर-१५ ए,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. **यांचे मार्फत रवाना.**